संकेतांक 198901272२

१०७

५९

क्रमांक कॉन एल. आर ३४/क-१/८९
पुणे, दिनांक :- २७-१-१९८९

परिपत्रक :

विषय /- जमीन एकत्रीकरण योजना
कर्मचारी व त्यांची जबाबदारी

भूमि अभिलेखांतील कोणताही कागद तयार झालेवर त्यावर तयार करणार/ तपासणी करणार यांच्या सह्या, नांवे, हुद्दा व दिनांक वगैरे तपशील देणेची प्रथा असून तसा तपशील देणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि एकत्रीकरण योजनेकामी तयार केलेल्या ब-याचशा कागदपत्रावर वरील प्रमाणे तपशील दिला जात नाही. ही बाब समाधानकारक नाही. तरी यापुढे कार्यालय प्रमुखा यांनी तयार करणेत आलेल्या प्रत्येक कागदपत्रावर वरील प्रमाणे तपशील दाखल केला जाईल अशी कार्यवाही करावी.

२/- एकत्रीकरण योजना व पोटहिस्सा मोजणी बाबत प्रत्येक कर्मचारी याना प्रत्येक कामाची तयारी/तपासणीचे विहित परिमाण या पूर्वीच ठरविणेत आले असून, पर्यवेक्षक व अधिकारी यांचे तपासणीची टक्केवारी ही ठरवून देणेत आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात एकत्रीकरण योजनेचे काम करताना कर्मचारी/पर्यवेक्षक हे स्वत:ची जबाबदारीची जाणीव न ठेवता योजनेचे काम घाईगडबडीने पूर्ण करतात. त्यामुळे कार्यान्वित योजनेवर अधिकार अभिलेखा, पोटहिस्सा मोजणी किंवा लिखाणांतील हस्तदोष इत्यादीबाबत मोठ्या प्रमाणांत तक्रारी अर्ज प्राप्त होतात. तक्रारी अर्ज चौकशीमध्ये योजनेत चुका अगर, दोष आढळुन आल्यास एकत्रीकरण कायदयातील तरतुदीस अनुसरून दुरुस्ती केली जाते. आणि अशा सर्व चुकांस/दोषास फक्त सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनाच व्यक्तिश: जबाबदार धरणेत येऊन त्यांचेविरुध्द कारवाई करणेत येते.

योजना तयार करणेकामी कर्मचारी व पर्यवेक्षक व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी या सर्वांचाच सहभाग असलेने योजनेतील चुकांस फक्त सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना जबाबदार न धरता संबंधित कर्मचारी/पर्यवेक्षक यांनाही जबाबदार धरणे आवश्यक आहे. याचा साकल्याने विचार करून एकत्रीकरण योजनेत होणा-या निरनिराळ्या चुकांस कोणांस जबाबदार धरावयाचे या संबंधात खालील प्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

-------/२....

S-10

१) एकत्रीकरण योजनेचे काम गावी सुरु करणेपूर्वी प्रथम भूमि अभिलेखावरून क्षेत्र/आकार आणि गांवचे अधिकार अभिलेखावरून कब्जेदारांची नांवे व इतर हक्क शेतपुस्तकांत नमुद केले जातात. हे काम एकत्रीकरण भूमापक/ नक्कल नवीस यांचेकडुन करवून घेतले जाते. वरील प्रमाणे शेतपुस्तकांत अंमल घेतानांच जर संबंधित कर्मचाऱ्यांनी जरूर ती खबरदारी घेतली तर योजनेत क्षेत्र/आकार/नांवे किंवा इतर हक्काबाबतच्या संभाव्य चुका टाळता येतील. तेव्हा संबंधित कर्मचाऱ्यांनी सदरचे काम अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. तथापि अशा कामांत चुका अगर दोष आढळुन आल्यांस संबंधित कर्मचारी हेच या चुकीस सर्वस्वी जबाबदार राहातील.

२) योजना तयार करणेपूर्वी अधिकार अभिलेख अद्यावत करणेसाठी एकत्रीकरण भूमापक/ मंडळ निरीक्षक हे प्रत्यक्ष रानात जाऊन शेतपहाणी करून जागेवरील वस्तुस्थितीनुसार फरक यादी तयार करतात. आणि रानांत अस्तित्वांत असलेल्या नवीन पोटहिश्यांची यादी करतात. परंतु भूमापकाने वरील प्रमाणे तयार केलेल्या याद्या जागेवरील वस्तुस्थितीप्रमाणे बरोबर आहे अगर कसे आणि नियमानुसार कार्यवाही केली जाते अगर कसे याबाबतची तपासणी संबंधित पर्यवेक्षक/निमतानदार यांचेकडुन काळजीपुर्वक केली जात नसलेने एकत्रीकरण योजनेत अनेक चुका/दोष आढळुन येतात. त्यामुळे तक्रारीस वाव मिळुन मोठया प्रमाणावर तक्रारी अर्ज/अपील प्राप्त होतात. हे टाळण्यासाठी वर उल्लेख केलेप्रमाणे नांवाची फरकयादी व नवीन पोटहिस्सा यादी प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थितीप्रमाणे बरोबर असलेची खात्री संबंधित पर्यवेक्षक/ निमतानदार यांनीच १०० % करणेची आहे आणि वरील दोन्ही बाबतीत चुका/ दोष आढळून आल्यास त्या चुकांस संबंधित निमतानदार/पर्यवेक्षक हेच सर्वस्वी जबाबदार राहतील.

३) आता पर्यंतच्या अनुभवावरून मंजूर/ कार्यान्वित योजनेवर चुकीच्या पोटहिस्सा मोजणीवर बऱ्याचशा तक्रारी अर्ज प्राप्त झालेचे निदर्शनास आलेले आहे. यावरून पोटहिस्सा मोजणी काम संबंधित भूमापक हे काळजीपूर्वक/आत्मीयतेने करीत नाहीत ही बाब नाकारता येत नाही. पोटहिस्सा मोजणी प्रत्यक्ष जागेवरील वहिवाटीप्रमाणे आणि नियमानुसार झालेस योजनेत पोटहिस्सा मोजणीत दोष राहाणार नाहीत यासाठी संबंधित पो. हि. भू. यांनी पोटहिस्सा मोजणीचे व तत्संबंधीचे कागदपत्र अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. अन्यथा या कामात चुका/दोष आढळून आल्यास संबंधित भूमापक हेच जबाबदार राहतील

------/३.....

S-11

४] त्याचप्रमाणे वरील कामाची तपासणी ही पर्यवेक्षक/ निमतानदार यांचेकडून
केली जात असलेने अशा कामात चुका अगर दोष आढळून [illegible] त्यास
संबंधित पर्यवेक्षक /निमतानदार हे सर्वस्वी जबाबदार राहातील.

५] एकत्रीकरण योजनेचे वेळी गटबांधणी कामी सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी
यांचेसमोर जबाब घेतले जातात. अशा जबाबांत अंतर्भूत होणाऱ्या सर्व
[illegible] शेतपाहाणी कब्जेदार व इतर हक्कांची नावे, तसेच पोटहिस्सा मोजणी
याची सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी व्यक्तिश: तपासून बरोबर
असल्याची खात्री करण्याची आहे. सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी
वरील प्रकारची काम हे त्यांचे वैयक्तीक काम असलेने काळजीपूर्वक करणेची
दक्षता घेणे आवश्यक आहे. कार्यान्वित झालेल्या योजनेचे जबाबात समाविष्ट
झालेल्या जमिनीबाबत वर नमुद केलेली कोणतीही चूक आढळून आल्यास
त्यास सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी हे व्यक्तिश: जबाबदार राहातील

तक्रारी अर्ज चौकशी वेळी वरील प्रमाणे चुका/दोष आढळून आल्यास
वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित कर्मचारी/पर्यवेक्षक /निमतानदार/ सहाय्यक एकत्रिकरण
अधिकारी यांना जबाबदार धरणेत येऊन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा,
[शिस्त व अपील] नियमावली १९७९ मधील तरतुदीस अनुसरून कारवाई करणेत यावी.

वरील सुचना विचारात घेऊन उपसंचालक भूमि अभिलेख यांनी
जबाबदार व्यक्तिविरुध्द त्यांचे स्तरावर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई होईल
याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.

स्थळ प्रतिवर मा. जमाबंदी आयुक्त, पुणे
यांची स्वाक्षरी आहे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, [महाराष्ट्र राज्य] पुणे
यांचेकरिता.

प्रतिलिपी/- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी
सादर अग्रेषित.

——/ ४....

**प्रतिलिपी/-** एकत्रीकरण अधिकारी[सर्व] विशेष अधिक्षक भूमि अभिलेख व एकत्रीकरण अधिकारी[सर्व] यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतिलिपी/-** सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी[सर्व] यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- वरील सुचनांची समज आपले कार्यालयांतील सर्व कर्मचारी यांना देण्यांत यावी आणि त्याप्रमाणे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी सुध्दा सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**प्रत /-** कार्यासन अधिकारी, क-१ ते कार्यासन अधिकारी क-७ यांना माहितीसाठी रवाना.

---

नालबंद/८९२७१

S-13